# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक २८

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक ०४/०४/२०२५ सकाळी ११-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ५. | श्री.किशोर सुडके | सहाय्यक आयुक्त |
| ६. | श्री.बाळासाहेब थत्तु | मुख्यलेखाअधिकारी |
| ७. | श्री शाहेद मो. युसुफ शेख | मुख्यलेखापरीक्षक |
| ८. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ९. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता |
| १०. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| ११. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १२. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| १३. | श्री.केडी साबळे | लिपीक,आस्थापना विभाग |
| १४. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १५. | श्री एन के बागुल | उप अभियंता , विद्युत विभाग |
| १६. | श्री.प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना विभाग |
| १७. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता, नगररचना विभाग |
| १८. | श्री.प्रदीप चव्हाण | उप अभियंता, बांधकाम विभाग |
| १९. | श्री.राजेंद्र माईनकर | भांडारपाल, भांडार विभाग |
| २०. | श्री मधुकर निकुंभे | वसुली विभाग |
| २१. | श्री राजेश गायकवाड | लिपीक शिक्षणमंडळ |
| २२. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २३. | श्री.अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २४. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |
| २५. | श्री सुर्यकांत हजारे | बाजार विभाग प्रमुख |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे

विषय क्रमांक:-४०८ मागील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक २६(बजेट) व २७ इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३८६ दिनांक ०४/०४/२०२५**

प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक २६(बजेट) सभा दिनांक ११/०२/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३८५ क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक २७ दिनांक ०५/०२/२०२५च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३५१ ते ३८४ अखेर क्रमशः वाचून कायम करणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४०९ सन २०२२-२०२३ चे वार्षिक लेखांबाबत तपासणी अहवाल मे. स्थायी समितीपुढे सादर.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मुख्य लेखा परिक्षक सन २०२२-२३ व २०२३-२४ या दोन्ही वर्षाची वार्षिक लेखे तपासणी झाली आहे. यातील ठळक निष्कर्ष नमुद केले आहे. वार्षीक लेख्यांवर सक्षम प्राधीकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. स्वाक्षांकित करुन ऑथेंटीकेट करण्यात आलेले नाहीत. दुसरा मुददा गुंतवणुक नोंदणीत ज्या क्रमाने गुंतवणुका करण्यात आल्या त्या क्रमाने नोंदविलेल्या नाहीत. मनपाकडे सन २०२३-२४ च्या अखेरीस जवळपास १६ कोटी ४ लाख ५६ हजार ८२५ रुपयांची अग्रीम आहे. ती वेगवेगळया कर्मचाऱ्यांकडे आहे. काही पदनामाने सुध्दा दिलेले आहे. ते कदाचित वसुलही झाले असेल. युआयडीएसएसएमटी अंतर्गत एका ठेकेदाराला अग्रीम दि.२३/१२/२०१४ रोजी रक्कम रु. १३,५८,४२,३४३/- दिलेला आहे. हा ३०/१२/२०१४ ला दिलेला आहे. आणि नोंदवहीत नोंद केलेली नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्याचे बिल झालेले असेल त्यात समायोजन झाले असेल पण त्याचा इफेक्ट रजिष्टरला आलेला नसेल.

मा.उपअभियंता अग्रीम दिलेला नाही मटेरियलपोटी ठेकेदाराला दिले होते. करारनाम्यातील तरतुदीनुसार त्यावेळी अग्रीम दिलेले होते.

मा.आयुक्त तथा प्रशासक सगळे पेपर काढा व तपासुन घ्या आणि लेखे तपासणीचा जो विषय आहे, ज्यांच्या स्वाक्षऱ्या नाही घेतल्या त्या त्या कंप्लायन्सेस करुन घेणे आवश्यक आहे. तशा स्वरुपाचे लेखा विभागाला पत्र वगैरे दिले आहे का की, त्याची पुर्तता करावी. जोपर्यंत स्वाक्षऱ्या घेवुन कंम्प्लीट करत नाही तो पर्यंत तो पर्यंत तपासणीला काही अर्थ रहात नाही. तुम्ही हे सर्व पुर्तता करुन फेरसादर करण्याबाबत लेखा विभागाला कळवावे.

मा.मुख्य लेखा परिक्षक त्यामध्ये बऱ्याचशा गोष्टी त्याचवेळी करणे गरजेच्या होत्या. जीपीएफ च्या रक्कमा एनकॉर्पोरेट केल्या नव्हत्या. त्या एनकॉर्पोरेट करुनच त्याचे स्टेटमेंट दाखल करायला हवे होते.

मा. आयुक्त तथा प्रशासक स्वाक्षऱ्या घेवुन मुख्य लेखाअधिकारी यांनी हे पुन्हा फेरसादर करावे.आणि मग तपासुन घ्या. कुठे कुठे बुक ॲडजस्टमेंट केले ते पाहुन घ्या. त्याचे रिपोर्टीग त्यांनी करावे. कर्मचाऱ्यांचे ॲडव्हान्स समायोजन झाले पाहिजे. मी जॉईन झाल्यापासुन कोणालाही ॲडव्हान्स दिलेला नाही. सर्व रजिस्टर अपडेट करुन घ्या आणि हा विषय पुन्हा फेरसादर करावा. सर्व मुदद‍े तपासुन घ्यावे.

मा.मुख्य लेखा परिक्षक जुन्या ठेविंच्या बाबतीत एक विषय आहे. त्या ठेवी परत दिल्यानंतर मायनस करता व ज्या नविन डिपॉझिट आहे जे आपल्याला देण आहे ते मनपाचे दायित्व असते. ते कुठेही वार्षिक लेख्यात रिफलेक्ट होत नाही. मनपाला किती देण आहे ते रजिस्टरवर रिफलेक्ट होत नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्याचा एक रिव्हयु घ्या. संयुक्तरित्या श्री. सुर्यवंशी व श्री. अटलाणी यांना त्यासाठी नियुक्त करा.एक जॉईन्ट ऑर्डर काढा. १५ दिवसात हे सर्व मार्गी लावा.सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३८७ दिनांक ०४/०४/२०२५**

महानगरपालिकेच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेख्यांची तपासणी लेखा विभागातील अनुषंगीक मूळ अभिलेख्यातील नोंदीनुसार करण्यात आलेली असून त्यावरील ठळक निष्कर्ष मे. स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला आहे.

या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने लेखा विभागाशी समन्वय ठेऊन याबाबतची पडताळणी करुन आवश्यक ती पूर्तता त्वरीत करण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४१० सन २०२३-२०२४ चे वार्षिक लेखांबाबत तपासणी अहवाल मे. स्थायी समितीपुढे सादर.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३८८ दिनांक ०४/०४/२०२५**

महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेख्यांची तपासणी लेखा विभागातील अनुषंगीक मूळ अभिलेख्यातील नोंदीनुसार करण्यात आलेली असून त्यावरील ठळक निष्कर्ष मे. स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला आहे.

या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने लेखा विभागाशी समन्वय ठेऊन याबाबतची पडताळणी करुन आवश्यक ती पूर्तता त्वरीत करण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४११ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये लेख्यांचा साप्ताहिक तपासणी अहवाल स्थायी समितीपुढे सादर.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात देखील ज्या छोटया छोटया गोष्टी आहे. ज्या करणे आवश्यक आहे ते इंटरनली कोऑडीनेशन ठेवुन करुन घ्या. सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३८९ दिनांक ०४/०४/२०२५**

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ०६/०१/२०२५ ते दि.१०/०१/२०२५ पर्यत तसेच दि. १३/०१/२०२५ ते दि. १७/०१/२०२५ व दि.२०/०१/२०२५ ते २४/०१/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २७/०१/२०२५ ते ३१/०१/२०२५ तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला.

या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने लेखा विभागाशी समन्वय ठेऊन याबाबतची पडताळणी करुन आवश्यक ती पूर्तता त्वरीत करण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४१२ अतिक्रमण निर्मुलन कारवाई साठी लावलेल्या यंत्रसामुग्री व मजुर खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. अति. अधिक्षक स्टेशन रोड परिसरात रस्त्याच्या बाजुला (आंबेडकरी ध्वज स्तंभ) चे बांधकाम केलेले आहे. त्या लगत कोणालाही न कळता मोठी टपरी ठेवुन अतिक्रमण केले होते. तक्रारीनुसार तसेच आंबेडकरी अनुयायांनी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात अतिक्रमण काढणेबाबत ठिय्या आंदोलन केले होते. उक्त टपरी मनुष्यबळाने उचलुन हलविणे शक्य नसल्याने व सदर परिसरात दहशतीचे वातावरण असलयाने क्रेन व खाजगी मनुष्यबळ उपलब्ध करुन सदरचे अतिक्रमण हटविले. याकामी रु. ८९००/- मात्र खर्च झाला असुन कार्योत्तर मान्यतेस्तव मे. स्थायी समितीसमोर विषय आलेला आहे. विषय मंजुर करण्यास हरकत नसावी.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९० दिनांक ०४/०४/२०२५**

स्टेशनरोड परिसरात रस्त्याच्या बाजूला (आंबेडकरी ध्वज स्तंभ) चे बांधकाम केलेले आहे. त्यालगत कोणालाही न कळता मोठी टपरी ठेवून अतिक्रमण केले आहे बाबत तक्रारीनुसार तसेच आंबेडकरी अनुयायांनी म.आयुक्त सो यांच्या दालनात सदर अतिक्रमणाचे तात्काळ दखल घेवून अतिक्रमण हटविणेबाबत ठिय्या आंदोलन केले होते.

उक्त बाबत नगररचना विभाग कनिष्ठ अभियंता व अतिक्रमण विभाग प्रमुख समक्ष पाहणीत सुमारे 10 X 10 फुटाची लोखंडी एँगल व पत्रा असलेली टपरी ठेवलेली आढळून आली. उक्त टपरी मनुष्यबळाने उचलून हलविणे शक्य नसल्याने क्रेन व खाजगी मनुष्यबळ उपलब्ध करुन म.आयुक्तांच्या तात्काळ अतिक्रमण हटविणेच्या सुचनेनुसार सदर टपरी क्रेन व मजुरांच्या साहाय्याने खाजगी ठेकेदार श्री निखील घनश्याम सुर्यवंशी आर्या सप्लायर्स यांच्या मार्फत जप्त करुन महानगरपालिकेत आणले. उक्त कामी एकूण ८९००/- रुपये मात्र खर्च झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार अतिक्रमण निर्मुलन कारवाई साठी लावलेल्या यंत्रसामुग्री व मंजुर खर्च रुपये ८९००/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४१३ धुळे महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१४ मधील आशिर्वाद बंगल्या जवळ चेंबर दुरुस्ती करणे कामास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता नागरीकांनी ऑनलाईन ग्रेवियंस पोर्टलवर केलेल्या तक्रारीनुसार पाहणी करुन सदरचे काम करुन घेण्यात आले आहे. कार्योत्तर मान्यतेस्तव मे. स्थायी समितीसमोर विषय आलेला आहे. विषय मंजुर करण्यास हरकत नसावी.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९१ दिनांक ०४/०४/२०२५**

धुळे महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१४ मधील आशिर्वाद बंगल्या जवळ चेंबरचा वरचा भाग तुटला असून व पाईप देखील चोकप असुन सांडपाणी वाहत असल्याने नागरिकांना त्रास होत आहे.

नागरिकांनी ऑनलाईन ग्रेवियंस पोर्टलवर केलेल्या तक्रारीनुसार समक्ष पाहणी केली असून सदर चेंबरचा वरचा भाग तुटलाअसून सदर ठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे तसेच पाईप देखील चोकप असुन सांडपाणी रस्त्यावर वाहत असल्याने दुर्गंधी पसरत आहे असे निर्देशनास आले.त्यानुसार सदरचे चेंबर व पाईप तातडीने दुरुस्त करणेचे तोंडी निर्देश देण्यात आले आहे.

त्याप्रमाणे सदर दुरुस्ती कामाचे राज्य शासनाच्या दरसूची नुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले असून सदर कामास रु.९४,७७०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

उक्त काम हे तातडीने व त्वरित करणे आवश्यक असल्याने सदरचे काम हे विना निविदा मे.अलिना कंन्सट्रक्शन, ठेकेदार, धुळे यांचे कडून करून घेण्यात आलेले असून सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व

५(२)(२) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु. ९४,७७०/- मात्रच्या खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी विषय मे.स्थायीसमिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, प्र.क्र.१४ मधील आशिर्वाद बंगल्या जवळ चेंबर दुरुस्ती करणे कामी झालेला खर्च रुपये ९४७७०/- मात्रला अधिनियम नियम ६७ (३) (क) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४१४ नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०८ मध्ये बारा फत्तर ते मुन्ना घी वाले यांच्या घरापर्यंत रस्ता रुंदीकरण करून कॉंक्रीट करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०८ मध्ये बारा फत्तर ते मुन्ना घी वाले यांच्या घरापर्यंत रस्ता रुंदीकरण करून कॉंक्रीट करणे बाबतच्या कामास रु.१,४९,९९,११७/- मात्र रकमेस मान्यता दिलेली आहे. त्यात निविदा मागविण्यात आली असता मे. मिलींद मुडावदकर यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. हा रस्ता शिवाजी महाराज पुतळा ते आमदार सो. यांच्या ऑफिसपर्यंत रस्ता कुठे १० मिटर तर कुठे १२ मिटर तर कुठे १५ मिटर असा होता. युजीडी चे काम करावे लागणार यात हे करणार आहोत. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्या रस्त्याचे युजीडी चे काम कधी करणार.

मा. उपअभियंता पुढील आठवडयात रस्त्याच्या दोनही साईडच्या करणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक मग आता जे साईड मधुन राहिले त्या बाजुने काम करणार का सेंट्रली कट करणार?

उपअभियंता दोन्ही साईडने पाईप घेतले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ते कनेक्शन आतल्या ट्रिब्युटरीजला टाकता येतात का. छोटे छोटे आतमधील इंटर्नल रस्ते आहेत.

मा. उपअभियंता पाईपलाईन विठठल मंदिरापासुन येणार आहे. दोन्ही साईडने ती २०० इंचची पाईपलाईन आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक तहसिल ऑफिसच्या बाजुला रेसिडेन्शीयल कनेक्शन नाही मग तेथे कसे करणार

मा.उपअभियंता मुख्य रस्ता असल्यामुळे पाईपलाईन घेतली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक या लोकांना बॅकलेनने कनेक्शन देता येईल का ते पहावे. कुठुन दुसरीकडुन करता येईल का ते पहा. हे व्हेरीफाय करा. सर्व कामे झाल्यानंतर बाकीचे कामे लावा. तेथे लोकांची नाराजी आहे. तेथे लोकांची अडचण होत आहे. तेथील लोकांनी अतिक्रमण केले आहे ते काढा मागे कारवाई केली पण परिस्थिती पुन्हा जैसे थे आहे. साक्रीरोड रस्त्यावर देखील अतिक्रमण आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग व ट्रॅफिक पोलिसांना सांगुन ते सर्व काढा. रसवंतीवाले उसाचे पाचट तेथेच टाकत आहे. त्यांना दंड लावा. मनपाचा इमर्जन्सी रस्ता दोनही बाजुंनी ब्लॉक करुन टाकला आहे. कारवाई करावी नाहीतर निलंबनाची ऑर्डर काढावी लागेल आणि अतिक्रमणाच्या मोहीमेच्या बाबतीत नालेसफाईचा विषय आहे. उगले साहेब व निकम साहेब त्याची तयारी करावी. परवाच्या लक्षवेधीचा विषय आहे. त्यात काही सुचना दिल्या आहे. फलड लाईन मध्ये येणारे जे जे अतिक्रमण आहे त्यापमाणे आपल्याला वर्कआऊट करावे लागतील. दोन दिवसात फलड लाईनमध्ये येणाऱ्या घरांची यादी बनवावी व पावसाळयाआधी कारवाई करावी. आणि रिहॅबिलेटशन फॉर दिस हाऊसचे रिझर्वेशन आहे तेथे जागा आहे तेथे तयारी करावी. हे पावसाळयाआधी युध्दपातळीवर करावे आणि त्याच्याशी संबंधीत जे जे आहे प्रधानमंत्री आवास योजनेमार्फत ते काम त्वरीत करावे लागेल तुम्हाला आता २ महिन्यात सर्व अतिक्रमणे काढावीत. सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९२ दिनांक ०४/०४/२०२५**

नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०८ मध्ये बारा फत्तर ते मुन्ना घी वाले यांच्या घरापर्यंत रस्ता रुंदीकरण करून कॉंक्रीट करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो.यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/ 1054/2024

दि.०७/१०/ २०२४ अन्वये उक्त कामच्या खर्चास रक्कम रु.१,४९,९९,११७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशाकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र./298/2024-25 दि.27/09/2024 अन्वये रक्कम रु. १,४९,९९,११७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./591/2024 अन्वये दि.०७/ १०/२०२४ रोजी दैनिक मिड डे/दिव्यमराठी या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०६/११/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे. मिलिंद मुडावदकर | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| 2 | मे. अंबिका इन्फ्रास्ट्रक्चर | शे.2 % जास्तीने | |
| 3 | मे. प्रवीण चौधरी | शे.1 % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री./मे.मिलिंद मुडावदकर यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे १,४९,९९,११७/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.मिलिंद मुडावदकर यांचे दर अंदाजपत्रक आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.मिलिंद मुडावदकर यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समितीसमोर सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार उक्त कामी आलेल्या श्री मे. मिलिंद मुडावदकर यांच्या अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

तसेच या रस्त्यावरील अतिक्रमण प्रथमत: निष्कासित करावीत. व सदर ठिकाणी प्रस्तावित भूमिगत गटारीचे काम प्रथम करण्यात येऊन नंतरच उक्त काम करण्यात यावे.

वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४१५ महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०५ मध्ये गवळी समाज स्मशानभूमी येथे बैठक व्यवस्था करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०५ मध्ये गवळी समाज स्मशानभूमी येथे बैठक व्यवस्था करणे बाबत कामाच्या खर्चास रक्कम रु.२९,८७,०५२/- मात्र रकमेस मान्यता दिली असता मे. सौरभ संजय कदमबांडे यांचे शे.- ०.९९ % कमीने दर आलेले आहे. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९३ दिनांक ०४/०४/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०५ मध्ये गवळी समाज स्मशानभूमी येथे बैठक व्यवस्था करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो.यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/ 1053/2024 दि.07/10/ 2024 अन्वये उक्त कामच्या खर्चास रक्कम रु.२९,८७,०५२/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशाकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र./399/2024-25 दि.२७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु.२९,८७,०५२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./590/2024 अन्वये दि.07/10/2024 रोजी दैनिक हिंदुस्थान टाईम /लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध

करणेत येऊन दि.05/11/2024 पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे. श्री स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन | श.1 % जास्तीने | |
| 2 | मे. आशिष एम.पटवारी | श.2 % जास्तीने | |
| 3 | मे. सौरभ संजय कदमबांडे | श.-0.99 % कमीने | सर्वात कमी दर |
| 4 | मे. सिद्धेश कन्स्ट्रक्शन | श.-0.90 % कमीने | |
| 5 | मे. आदर्श कन्स्ट्रक्शन | श.1 % जास्तीने | |
| 6 | मे.ऋषभ राजेंद्र पाटील | श.2 % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री./ मे.सौरभ संजय कदमबांडे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 29,57,480/- इतक्या रक्कमेचे असून श.-00.99% कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.सौरभ संजय कदमबांडे यांचे दर श.-००.९९% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.सौरभ संजय कदमबांडे यांची श.-००.९९% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता उक्त कामी श्री/मे.सौरभ संजय कदमबांडे यांचे श. -००.९९% कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४१६ महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०२ मध्ये प्रदीप पाटील प्लॉट नं.१४ भोई सोसा.यांच्या घरापासून ते अविनाश सोनवणे आनंद नगर भोई सोसा.यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०२ मध्ये प्रदीप पाटील प्लॉट नं.१४ सोई सोसा.यांच्या घरापासून ते अविनाश सोनवणे आनंद नगर भोई सोसा.यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे कामाच्या खर्चास रक्कम रु.२९,९९,३३७/- मात्र रकमेस मान्यता दिली असता मे. सिद्धेश कन्स्ट्रक्शन यांचे श.-०.९९ % कमीने दर आलेले आहे. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९४ दिनांक ०४/०४/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०२ मध्ये प्रदीप पाटील प्लॉट नं.१४ सोई सोसा.यांच्या घरापासून ते अविनाश सोनवणे आनंद नगर भोई सोसा.यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो.यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/ 1053/2024 दि.०७/१०/२०२४ अन्वये उक्त कामच्या खर्चास रक्कम रु.२९,९९,३३७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशाकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र./403/2024-25 दि.०४/१०/२०२४ अन्वये रक्कम रु. २९,९९,३३७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./590/2024 अन्वये दि.०७/१०/२०२४ रोजी दैनिक हिंदुस्थान टाईम /लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०६/११/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार

यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे. श्री स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन | शे.2 % जास्तीने | |
| 2 | मे. आशिष एम.पटवारी | शे.1 % जास्तीने | |
| 3 | मे. सिद्धेश कन्स्ट्रक्शन | शे.-0.90 % कमीने | सर्वात कमी दर |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री./मे.सिद्धेश कन्स्ट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २९,७२,३४३/- इतक्या रक्कमेचे असून शे.-०.९०% कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.सिद्धेश कन्स्ट्रक्शन यांचे दर शे.-०.९०% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.सिद्धेश कन्स्ट्रक्शन यांची शे.-०.९०% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता याकामी श्री/मे.सिद्धेश कन्स्ट्रक्शन यांचे शे.-०.९०% कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी. **सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४१७ महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.११ मध्ये संत श्रेष्ठ जगनाडे महाराज चौक ते शेतकरी पुतळा पाटील रोड पर्यंत रस्ता काँक्रीट करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.११ मध्ये संत श्रेष्ठ जगनाडे महाराज चौक ते शेतकरी पुतळा पाटील रोड पर्यंत रस्ता काँक्रीट करणे बाबत कामाच्या खर्चास रक्कम रु.१,९६,६५,५१७/- मात्र रकमेस मान्यता दिली असता मे.निलेश प्रकाश जाधव यांचे शे.-००.२१ % कमीने दर आलेले आहे. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९५ दिनांक ०४/०४/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.११ मध्ये संत श्रेष्ठ जगनाडे महाराज चौक ते शेतकरी पुतळा पाटील रोड पर्यंत रस्ता काँक्रीट करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो.यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/ 1053/2024 दि.०७/१०/२०२४ अन्वये उक्त कामच्या खर्चास रक्कम रु.१,९६,६५,५१७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशाकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र./350/2024-25 दि.२७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु. १,९६,६५,५१७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./590/2024 अन्वये दि.०७/१०/२०२४ रोजी दैनिक हिंदुस्थान टाईम /लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०६/११/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.निलेश प्रकाश जाधव | शे.-00.21 % कमीने | सर्वात कमी दर |
| 2 | मे.ऐ.बी.वाघ | शे.2.50 % जास्तीने | |
| 3 | मे.बी.आर.भदाणे | शे.1.20 % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री./ मे.निलेश प्रकाश जाधव यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे १,९६,२४,२१९/- इतक्या रक्कमेचे असून शे.-००.२१ % कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.निलेश प्रकाश जाधव यांचे दर शे.-००.२१ % कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे. निलेश प्रकाश जाधव यांची शे.-००.२१ % कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता याकामी श्री./मे.निलेश प्रकाश जाधव शे.-००.२१ % कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४१८ महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.३ प्रवीण बागुल यांचे घर ते वासंती बंगल्या पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.३ प्रवीण बागुल यांचे घर ते वासंती बंगल्या पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे बाबत कामाच्या खर्चास रक्कम रु.२९,९८,१६७/- मात्र रकमेस मान्यता दिली असता मे. पवार वैभव भालचंद्र यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९६ दिनांक ०४/०४/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती महाभियान नगरोत्थान (जिल्हास्तर) सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.३ प्रवीण बागुल यांचे घर ते वासंती बंगल्या पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो.यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/ बांध/1053/2024 दि.०७/१०/ २०२४ अन्वये उक्त कामच्या खर्चास रक्कम रु.२९,९८,१६७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशाकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र./406/2024-25 दि.२७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु. २९,९८,१६७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./590/2024 अन्वये दि.०७/१०/२०२४ रोजी दैनिक हिंदुस्थान टाईम/लोकमत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०६/११/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे. पवार वैभव भालचंद्र | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| 2 | मे. जीज्ञेश किशोर खैरनार | शे.2.00 % जास्त | |
| 3 | मे. सचिन नानाभाऊ आखाडे | शे.3.50 % जास्त | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री./मे.पवार वैभव भालचंद्र यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २९,९८,१६७/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.पवार वैभव भालचंद्र यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.पवार वैभव भालचंद्र यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता याकामी श्री/ मे.पवार वैभव भालचंद्र यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४१९ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.११ बाळापुर शिवारात आदर्श एकता नगरच्या परिसरात रस्ता काँक्रीटीकरण करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.११ बाळापुर शिवारात आदर्श एकता नगरच्या परिसरात रस्ता काँक्रीटीकरण करणे बाबत कामाच्या खर्चास रक्कम रु. २९,७६,५९५/- मात्र रकमेस मान्यता दिली असता मे.जयेश सतिष मगर यांचे शे.- ७.००% कमीने दर आलेले आहे. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९७ दिनांक ०४/०४/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.११ बाळापुर शिवारात आदर्श एकता नगरच्या परिसरात रस्ता काँक्रीटीकरण करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/1053/2024-25 दि.07/10/2024 यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. 29,76,595/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./374/2024 दि.२७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु. २९,७६,५९५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./594/2024 अन्वये दि.०८/१०/२०२४ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करणेत येऊन दि.०६/११/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.जयेश सतिष मगर | शे.- 7.00% कमीने | सर्वात कमी दर |
| 2 | मे.अजय रमेश वाणी | अंदाजपत्रकीय दराने | |
| 3 | मे.अे.के.सैफी | शे.1.00 % जास्तीने | |
| 4 | मे.सौरभ संजय कदमबांडे | शे.2.00 % जास्तीने | |
| 5 | मे.मिलिंद दयाराम सोनवणे | शे.2.00 % जास्तीने | |
| 6 | मे.अमोल अरविंद बोरसे | शे.3.00 % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/मे.जयेश सतिष मगर यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २७,६८,२३३/- इतक्या रक्कमेचे असून शे.-७.००% कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.जयेश सतिष मगर यांचे दर शे.-७.००% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.जयेश सतिष मगर यांची शे.-७.००% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता याकामी श्री/मे.जयेश सतिष मगर शे.-७.००% कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४२० नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र. ०९ मध्ये गायकवाड चौक ते पोलीस चौकीपासून उत्तरेस भिल वस्ती पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे कामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता नागरी दलित वस्ती सुधार योजनासन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र. ०९ मध्ये गायकवाड चौक ते पोलीस चौकीपासून उत्तरेस भिल वस्ती पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे बाबत कामाच्या खर्चास रक्कम रु. 44,97,682/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली असता मे.एकविरा कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९८ दिनांक ०४/०४/२०२५**

नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र. ०९ मध्ये गायकवाड चौक ते पोलीस चौकीपासून उत्तरेस भिल वस्ती पर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/1089/2024-25 दि.११/१०/२०२४ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ४४,९७,६८२/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./308/2024 दि.२७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु. ४४,९७,६८२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां..वि./73/2024 अन्वये दि.११/१०/२०२४ रोजी दैनिक पुण्यनगरी /मर्डर या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.२३/१०/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. गायत्री कन्स्ट्रक्शन | शे. ३.०० % जास्तीने | |
| २ | मे.एकविरा कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | **सर्वात कमी दर** |
| ३ | मे.रामेश्वर ट्रेडर्स | शे. ४.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.एकविरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ४४,९७,६८२/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे.वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.एकविरा कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रक आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.एकविरा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समिती समोर सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता याकामी श्री/ मे.एकविरा कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराने या आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४२१ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०४ मध्ये राजपूत कॉलनी अंतर्गत बंदिस्त गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक साईड पट्टी बांधकाम करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०४ मध्ये राजपूत कॉलनी अंतर्गत बंदिस्त गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक साईड पट्टी बांधकाम करणे कामाच्या खर्चास रक्कम रु.५९,९९,४८३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली असता मे. निलेश प्रकाश जाधव यांची शे.-.११ % कमीने दर आलेले

आहे. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३९९ दिनांक ०४/०४/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.०४ मध्ये राजपूत कॉलनी अंतर्गत बंदिस्त गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक साईड पट्टी बांधकाम करणे तसेच रस्त्याला थर्मो प्लास्टिकपेंट बसविणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/ 1053/2024-25 दि.०७/१०/२०२४ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.५९,९९,४८३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./414/2024 दि.२७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु. ५९,९९,४८३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/पा.पु.वि./590/2024 अन्वये दि.०७/१०/२०२४ रोजी दैनिक हिंदुस्थान टाईम्स/लोकमत या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०६/११/२०२४ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.निलेश प्रकाश जाधव | शे.-0.11 % कमीने | सर्वात कमी दर |
| 2 | मे.बी.आर. भदाणे बिल्डकॉन एलएलपी | शे.1.11 % जास्तीने | |
| 3 | मे.अे.बी.वाघ | शे. .11 % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/मे.निलेश प्रकाश जाधव यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ५९,९२,८८३/- इतक्या रक्कमेचे असून शे.-०.११ % कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.निलेश प्रकाश जाधव यांचे दर शे.-०.११ % कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.निलेश प्रकाश जाधव यांची शे.-०.११ % कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता याकामी श्री/ मे.निलेश प्रकाश जाधव यांचे शे.-०.११ % कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| मा.आयुक्त तथा प्रशासक | ईंदाई रिसायकलींग संस्थेने किती ईनर्ट आणि किती रिजेक्ट केले. |
| मा.उपअभियंता | सदर संस्था दिवसाला ७० ते ८० टनापर्यंत प्रोसेस करतोय. त्यातील ४-५ टनापर्यंत रिजेक्ट बाहेर निघत आहे.मिक्सवेस्ट असल्यामुळे सॉर्ट आऊट होत नाही. |
| मा.आयुक्त तथा प्रशासक | ५ टनाचा दर दिवसाला विचार केला तर यासाठी प्रोजेक्ट करता येईल का जो ५ टनाचा डेली वर्कआऊट होईल. जो ईलेक्ट्रीसिटी जनरेशनला प्रोसेस होईल आणि त्याला एमपीसीबी कंसेट देते. आता जे सॅनिटरी वेस्ट ते यात जाईल तुम्हाला त्याचा ही फायदा होईल.असा एखादा कोणी त्याची टेक्नॉलॉजी लावुन आपल्याला करुन देणारा कोणी असेल तर पहा. सॅनिटरी लॅण्ड फिलची २ वर्षात डम्प साईट सारखी परिस्थिती होईल ०.१ टक्के पेक्षा कमी जे नॉन प्रोसेसेबल इनर्ट गेले पाहिजे. सॅनिटरी लॅण्डफिल मध्ये. बऱ्याच ठिकाणी कचरा विकत घेवुन प्रोसेसिंग करतात. कोणीही याला तयार होईल. कोणी पीपीपी मध्ये करायला तयार आहे ते पण पहा. आजुन काही पर्याय असतील ते पहा. सॅनिटरी लॅण्ड फिलचे कामाचा पिरिएड काय आहे. |

मा.उपअभियंता सहा महिने कालावधी आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक बायोगॅस प्राजेक्ट रन झाला पाहिजे.

उपायुक्त बायोगॅससाठी ट्रान्सफॉर्मर बसवायचा बाकी आहे. तेवढाच मुददा पेंडींग आहे. तेथे सोलरही आपण बसवणार आहोत. दोघांसाठी कॉमन युज होईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक बायोगॅसचे काम या महिन्यात प्राधान्याने संपवुन टाका.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४१४ दिनांक ०४/०४/२०२५**

मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशानुसार इकडील कार्यालयामार्फत Construction of Sanitary Landfill and Leachate Collection Tank at Varkhedi Road, Dhule. (2nd Call फेरनिविदा) सन २०२४-२५ या कामाची ई-निविदा सूचना क्र. 127 दि.०५/१२/२०२४ नुसार निविदा मागविण्यात आली होती.उक्त संदर्भात निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला असून तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. यात तिन्ही निविदा धारकांनी काही तांत्रिक कागदपत्रे सादर केलेली नाहीत. यानुसार त्यांना email द्वारे कळविण्यात आले असून निविदा धारकांनी सदर ची कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यानुसार निविदा धारकांनी सदर केलेल्या कागदपत्रानुसार स्क्रुटिनी तक्ता सादर केला असता सदर दोन निविदा धारकांना अपात्र व उर्वरित एक निविदा धारकाला पात्र ठरविण्यात आले असून तिसरी फेरनिविदा असल्याने वित्तीय लिफाफा उघडण्यात आला.

| Bidders Name | Bhushan L Chaudhari, Dhule | Tulsiram Enterprises, Pune | Vishakha Civil & Environmental Engg., Nashik |
|---|---|---|---|
| Result | Disqualified | Qualified | Disqualified |

उक्त संदर्भात निविदेचा वित्तीय लिफाफा उघडण्यात आला असून M/s Tulsiram Enterprises, Pune हे शे.4.00 % कमीने L१ आहेत. त्यानुसार सदरची निविदा दर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता याकामी पात्र निविदाधारक M/s Tulsiram Enterprises, Pune यांच्या शे.4.00 % कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे. संबंधितांकडून आवश्यक तो अटी शर्तीचा करारनामा करुन घेण्यात यावा. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४३७ स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत मागविण्यात आलेल्या Providing, supply, Fixing, Insatallation & Commmissioning Of Municipal Solid Waste Wet and Dry Waste याकामाच्या दर मंजुरीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता स्वच्छ भारत कार्यक्रमाअंतर्गत वेट प्रोसेसिंग, ड्राय प्रोसेसिंग या मशिनरी मंजुर झाल्या आहेत. मशिनरी बसविण्यासाठी निविदा दर मागविण्यात आले होते. त्यात सगळयात कमी दराची निविदा रॉयल वेस्टर्न प्रोजेक्टस LLP यांची आलेली आहे. दर मंजुरीस्तव हा विषय स्थायी समितीपुढे सादर केला आहे. यात टिपींग फी घेतली आहे. रु. ८९२/- प्रती टन आहेत तथापी वाटाघाटीसाठी बोलावुन ती रु.८७०/- पर्यंत कमी केली आहे. मनपाची आर्थिक स्थिती पाहता शासन निधी उपलब्ध न झाल्यास प्रोसेसिंग फी देणे शक्य होणार नाही. तोपर्यंत केवळ यंत्रणा स्थापन करणे व कार्यान्वित करण्याच्या कामास मान्यता देणे उचित वाटते. त्यासाठी हा विषय मे. स्थायी समितीसमोर सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक टिपींग फी चा काय विषय आहे.

मा.उपायुक्त टिपींग फी ठेकेदाराने रु. ८९२/- प्रती टन भरली होती

मा.आयुक्त तथा प्रशासक आता तर आपल्याच ठेकेदाराकडुन तेथे कचरा जातोय.

मा.उपायुक्त फक्त प्रोसेसिंगची यंत्रणा तो लावणार आहे. त्याची कामगार यंत्रणा आहे व स्वत:ची जास्तीची मशिनरी तो लावणार होता मग त्या संदर्भात जे प्रोसेसिंग होईल त्यातील टिपींग फि तो मागत

होता. निगोसिएशन करुन सदर फी रु. ८७०/- रु. प्रती टनाप्रमाणे तो तयार होता. परंतु चालु परिस्थिती पाहता १५० टनाची प्रोसेसिंग यंत्रणा आहे. त्यातील १०० टन रोज प्रोसेस झाला तरी रु. ८७०००/-प्रति दिवस आपण त्याला देणं लागतो. मनपाची आर्थिक स्थिती देण्यासारखी नाही. टिपींग फी मध्ये लाईटबील व इतर खर्च असेल.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता इंदाई रिसायकलींग ही संस्था करतोय त्याचे कसे प्रोसेस करता तुम्ही ?

मा.उपायुक्त इंदाईवाल्याचे लाईट बील आपण भरतो आहे. मशिनरी संपुर्ण त्याची आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ही मशिनरी इन्स्टॉल करुन घ्या. आणि आता जो प्रोसेसिंग करणारा ठेकेदार आहे त्याच्या कडुनच हे पण करुन घ्यावे. त्याला अतिरिक्त मशिनरी मिळुन त्याचे बर्डन कमी होवुन जाईल. आपल्याला टिपींग फि वर काम करायचे नाही. फक्त मशिनरी इन्स्टॉलेशनचा विषय आहे ता करुन घ्या. मशिनरीमध्ये काय काय देणार आहे?

मा. उपायुक्त त्यामध्ये ट्रॉमेल आहे, सेग्रेगेटर आहे, जे आता साईटवर आहे तशीच यंत्रणा ही दुसरी पण बसणार आहे.

मा.आयुक्त सद्यस्थितीत याचा कितीचा हप्ता आला आहे.

मा.उपायुक्त सर्व मिळुन ५ कोटी दिले आहे. त्यात केंद्र शासनाचा ३३ टक्के व राज्य शासनाचा ३७ टकके आहे व मनपाचा ३० टक्के आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सध्या मशिनरीवरच काम करावे त्याची युसी गेल्यानंतर पुढची रक्कम येणार आहे. त्यामुळे दोन्ही कामे टाईमलाईन ठेवुन कामे पुर्ण करावी आणि उर्वरीत राहिलेल्या डीपीआर चे काय आहे?

मा.उपायुक्त हा फेज पुर्ण झाल्यावर UC गेली की पुढील DPR पुर्ण होतील एकदम पैसे डम्प होतात म्हणुन टप्याटप्याने DPR मंजुर होतील.

मा.आयुक्त तथा प्रशासक अजुन बायोमाईनिंगचा विषय आहे. अजुन काही विषय आहेत.

मा.उपायुक्त बायोमाईनिंगचा जो प्रस्ताव पाठवला होता तो राज्य संचालनालयाकडुन केंद्राकडे गेलेला आहे. पुर्ण महाराष्ट्राचा एकत्रित करुन तेथुन मंजुरी आली की ते पैसे वर्ग होतील.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे वर्क आऊट करुन घ्या. याच्या ऑपरेशनल पार्टवर काम करायचे नाही हे ठरावात नमुद करा. त्यामुळे टिपींग फी वर काम करायचे नाही. जीमशिनरी प्रोक्युरमेंट व इंन्स्टॉलेशनचे तेवढेच काम त्याला द्यायचे आहे. काम त्याच्याकडुन करुन घ्यावे. इलेक्ट्रीकची काय रिक्वायरमेंट आहे. ती प्रोव्हिजन आहे का डीपीआर मध्ये त्या ट्रान्सफॉर्मरवर याचा लोड मॅनेज होईल का. तसेच यासाठी पुन्हा वेगळी प्रोव्हीजन करावी लागणार आहे.

मा.उपायुक्त याबाबत एकदा खात्री करुन घेवु तसेच लोड कॅलक्युलेट करुन घेतो.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे सगळे एकत्र करुन प्रस्ताव पुढील ८ दिवसात सादर करायचे आहे. आता सॅनिटरी लॅण्ड फील होणार उद्या C & D चा प्रोजेक्ट टाकणार C & D ला पण इलेक्ट्रीकची प्रोव्हिजन लागेलच मग पुन्हा अजुन ट्रान्स्फॉर्मर बसवणार का. प्रपोजल बनवता व एवढे मोठे डीपीआर बनवता त्यामध्ये प्रोव्हीजन का नाही केली. ही रिक्वायरमेंट का नाही व्हिज्युवलाईज केली. ३० टक्के मनपाचे हिस्याचे टाकल्यानंतर पण यासाठी जे पैस टाकावे लागतील ते १०० टक्के टाकावे लागतील. मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करावा. आजच्या घडीला मनपाचे पाणी पुरवठयाचे बिल देण्यासाठी पैसे नसतात. हे सगळे कॅलक्युलेट करावे व पुढील आठवडयात पुन्हा विषय ठेवावा. याच्या दरास मान्यता देण्यात येत आहे. ३ कोटीच्या कामास मान्यता देण्यात येत आहे. पण इलेक्ट्रीक लोड काय लागेल. त्याला किती पैसे लागतील हे तपासुन पहा. ज्याअर्थी डीपीआर मंजुर केला तीपुढील २०-२५ वर्षाची रिक्वायरमेंट धरुन केला असेल. हया प्रोजेक्टला शासनाने मान्यता दिलेली आहे तो करायचा यासाठी जी लाईटची प्रोव्हिजन आहे त्यासाठी बसविलेल्या ट्रान्सफॉर्मरवर भागत असेल अडचण नाही पण अजुन मनपाला एमएसईबी ला ६० ते ६२ लक्ष रुपये भरायचे आहेत.

मा.उपायुक्त याबाबत संबंधीतांशी बोलावे. मार्च एंडला बरिचशी रक्कम शिल्लक असते. २ कोटी ते २.५ कोटी मिळु शकतात.

मा.आयुक्त तथा प्रशासक यासाठी हे कॅलक्युलेशन करुन द्यावे. सद्यस्थितीत जे प्रोजेक्ट आहे. यांची जी रिक्वायरमेंट आहे. हे सगळे फुलफिल होवुन वर्कआऊट करावे लागेल. याबाबतचा येणारा खर्चाचा प्रस्ताव SWM च्या संचालकांकडे सादर करा. आम्ही यात ट्रान्स्फॉर्मरचे पैसे गृहीत धरले नाही. आम्हाला याची गरज आहे तर १ कोटी ६३ लाख त्यामध्ये द्या. याबाबत मी सेक्रेटरी सरांशी बोलते. यातले निम्मे जरी पैसे आले तर भार कमी होवुन जाईल.

मा. उपायुक्त यात DPR मध्ये जेवढे आयटम आहे त्यातील प्रत्येकाचा लोड कॅलक्युलेट करुन घेवु.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४१५ दिनांक ०४/०४/२०२५**

मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशानुसार स्वच्छ भारत अभियान 2.0 अंतर्गत इकडील कार्यालयामार्फत Providing,Supply, Fixing, Installation & Commissioning Of Municipal Solid Waste Wet And Dry Waste Processingplant Machinery With Material Recovery Facility Of १०० Tpd Capacity Each With Civil Work With Running Projectfor ३+२ Years And Machinery O&M For Three Years At Varkhedi Road, Compost Depo Site At Dhule सन 2024-25 या कामाची ई-निविदा सूचना क्र. 64 दि.13/09/2024 नुसार निविदा मागविण्यात आली होती.

उक्त संदर्भात निविदेचा तांत्रिक व वित्तीय लिफाफा उघडण्यात आलेला असून त्यात दोन निविदाधारक अनुक्रमे 1) Royal Westn Projects LLP व 2) Aadarsh Bharat Enviro Pvt.Ltd. यांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

यात पुढील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

उक्त नुसार M/s.Royal Westn Projects LLP, Pune यांनी ई-निविदा सूचना क्र.64 भरली असता ते रक्कम रु.3,00,00,000/- नुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असून 892/- प्रती टन Tipping Fee या दरानुसार L१ आहेत. परंतु सदरचे दर जास्तीचे वाटत असल्याने वाटाघाटी अंती सदर संस्थेने निविदेत सादर केलेल्या दरापेक्षा 5 रुपये कमीने म्हणजेच 887/- प्रती टन याप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

उक्त कामी मा. उपायुक्त यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार सदर निविदा धारकांनी दि. 31/01/2025 रोजी email द्वारे पत्र देऊन रु.878/- प्रती टन या प्रमाणे काम करण्यास तयार असल्याचे पत्र व सविस्तर दर विश्लेषण सादर केलेले आहे.

तथापी मा. उपायुक्त सो. यांनी दर दिवशी र.रु. 875 / टन नुसार Processing Fee द्यायची असल्यास त्याचा सर्वभार हा मनपा फंडावर येणार आहे व सद्यास्थितीत मनपा फंडाची स्थिती नाजुक आहे. परंतु जर शासन निधी उपलब्ध झाल्यास Processing Fee देणे शक्य होईल. तरी तोपर्यंत केवळ यंत्रणा स्थापन करणे व कार्यान्वित करण्याच्या कामास मान्यता देणे उचित वाटते. असा अभिप्राय सादर केलेला आहे.

याकामी निधी उपलब्ध झाल्यास Per Tone Processing चा उपरोक्त नमुद दर अथवा Negotiation नुसार र. रु.870/- दर देण्यात येईल या अटीवर सद्यस्थितीत Machinary Installation ची Work Order देण्यात यावी असा अभिप्राय नमूद करुन प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता सदर डिपीआर मधील इतर प्रकल्पातील मशिनरी साहित्यास मान्यता प्राप्त आहे. त्या प्रकल्पाच्या क्षमतेनुसार त्यासाठी किती विजभार लागणार आहे याचा अंदाज घेऊन एकत्रित आराखडा तयार करावा. व यासाठी येणारा खर्च शासकीय निधीतून उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव सादर करावा. प्रोसेसिंगसाठी शासनामार्फत निधी उपलब्ध झाला तर संबंधित कंत्राटदार यांनी वाटाघाटी अंती निविदेत सादर केलेला दर देण्याबाबत स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल तोपावेतो या प्रस्तावातील यंत्रणा स्थापन करणे व कार्यान्वित करणेसाठी Machinary Installation बाबत कार्यादेश देण्यात मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४३८ माहे जानेवारी-2025 मध्ये Breeding Checkers यांचे कामासाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक किती दिवस रिक्वायरमेंट आहे ब्रिडींग चेकर्सची

मा.मलेरीया पर्यवेक्षक मार्च पर्यंत १ महिना मुदत वाढवली होती आता बंद केले आहे.आता जुन महिन्यापासुन पुन्हा सुरु होईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४१६ दिनांक ०४/०४/२०२५**

धुळे महानगरपालिका क्षेत्रात परिसर स्वच्छतेचा अभाव पावसाळ्यात साचलेले पाणी यामुळे चिकनगुनिया आणि डेंग्यु, मलेरीया सारख्या साथरोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने वाढणाऱ्या एडीस डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण मिळणे करीता प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे. व त्याकरीता मलेरीया विभागाकडे पुरेशे मनुष्यबळ उपलब्ध नसल्या कारणाने शासन निर्णयानुसार पारेषण काळात २८ Breeding Checkers उपलब्ध करुन घेणेकामी राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाच्या अर्थसंकल्पात दोन महिने कालावधी करीता निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता व शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार २८ Breeding Checkers यांची निवड करण्यात आली आहे.

आरोग्य विभागांतर्गत मलेरीया विभागाकरीता आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होणेकामी ई-निविदा क्र.१०५ दिनांक ७/१०/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार उक्त नियुक्त २८ Breeding Checkers यांच्याकडुन माहे जानेवारी-२०२५ मध्ये एकुण २५ दिवस व तसेच फेब्रवारी २०२५ मध्ये एकूण २२ दिवस काम करुन घेण्यात आले आहे.

उक्त २८ Breeding Checkers यांचे माहे जानेवारी मधील २५ दिवसांचे रु.४५०/- प्रति दिवस प्रमाणे एकुण रक्कम रु.३,१५,०००/- (तीन लक्ष पंधरा हजार मात्र ) वेतन होत आहे. तसेच माहे फेब्रवारी मधील एकूण २२ दिवसांचे २७७२००/- मात्र वेतन होत आहे. उक्त खर्चासाठी धुळे महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात १ कोटी रुपयांची तरतुद दर्शवीली आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता माहे जानेवारी व फेब्रुवार-2025 मध्ये Breeding Checkers यांचे कामासाठी झालेला खर्च रुपये रु.५,९२२००/- मात्रला कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४३९ देवपूर भागांतील स.नं.२८/२ येथील मनपा आरक्षित जागेवरील कंपाऊंड वॉलला गेट बसविणे कामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४१७ दिनांक ०४/०४/२०२५**

देवपूर भागांतील दत्त मंदिर परिसरातील भाजी विक्रेते यांना नवरंग जलकुंभालगत स.नं.28/2 येथील मनपा आरक्षित जागेवर स्थलांतरीत करणे बाबत मा.आमदार श्री.अनुपभैय्या अग्रवाल यांनी दि.02/01/2025 रोजी पाहणी करून आदेशित केले होते.त्यानुसार सदर जागेच्या दक्षिण बाजूकडील भिंतीचे 2 गेट तातडीने बसविणे बाबत आदेशित केले होते.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामास शासकीय दरसूची सन 2022-23 नुसार रु.1,37,951/-मात्र अंदाजित खर्च अपेक्षित आहे.सदरचे काम तातडीने करणे गरजेचे असल्याने उक्त काम ठेकेदार मे.आलिना कन्सट्रक्शन,धुळे यांच्या मार्फत विना निविदा करून घेण्यात आले आहे.सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम 67 (3) (क) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.1,37,951/-मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता देवपूर भागांतील स.नं.२८/२ येथील मनपा आरक्षित जागेवरील कंपाऊंड वॉलला गेट बसविणे कामी झालेला खर्च रुपये 137951/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम 67 (3) (क) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४४० धुळे जिल्यातील गतिरोधक/ रम्बलर स्ट्रीप बसविणे व अपघात प्रवण स्थळांवर दीर्घकालीन उपाययोजना करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४१८ दिनांक ०४/०४/२०२५**

गतीरोधक समितीच्या बैठकी नुसार गतीरोधक समिती मार्फत अपघात प्रवण स्थळांवर दीर्घकालीन उपाययोजना संदर्भात चर्चा झाली असून म. जिल्हाधिकारी धुळे यांच्या आदेशानुसार धुळे शहरातील अपघात प्रवण स्थळांवर दीर्घकालीन उपाययोजना करण्यात याव्या. अपघात प्रवण क्षेत्रांवर Parmanant Measure म्हणून Directional Boards , Transport Sambhaji Maharaj Garden वRoad Marking with thermoplastic Paint for Rumbler Strip करणे आवश्यक आहे.

उक्त बाबत अग्रसेन लॉन पांझरा नदी किनारी , तिरंगा चौक व पांझरा नदी किनारी Directional Boards,Transport Sambhaji Maharaj Garden वRoad Marking with thermoplastic Paint for Rumbler Strip करणे कामी रक्कम रु.2,47,995/- मात्रचा खर्च येणारा आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांच्या रहदारीच्या सोईच्या दृष्टीने आवश्यक असल्याने सदर काम विना निविदा मे.आर.पी. इंजिनिअरिंग वर्क्स , धुळे यांचे कडून करून घेणेस सदरचे काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम 67 (3) (क) अन्वये त्वरित काम करण्यास व 5(2) (2) अन्वये विना निविदा करण्यास मंजुरीसाठी व अंदाजपत्रकीय खर्च रु.2,47,995/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता धुळे जिल्यातील गतिरोधक/ रम्बलर स्ट्रीप बसविणे व अपघात प्रवण स्थळांवर दीर्घकालीन उपाययोजना करणे बाबत झालेला खर्च रु.2,47,995/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नियम 67 (3) (क) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४४१ मनपा निधी सन २०२४-२५ अंतर्गत धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारतीच्या पूर्ण बाजूस रेकॉड रूम बनविणे कामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता मनपा निधी सन २०२४-२५ अंतर्गत धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारतीच्या पूर्व बाजूस रेकॉड रूम बनविणे बाबत कामाच्या खर्चास रक्कम रु.१,२८,७८,५८२/- मात्र रकमेस मान्यता दिली असता मे.आशिष एम पटवारी यांची शे. ९.९९% कमीने निविदा आलेली आहे. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४१९ दिनांक ०४/०४/२०२५**

मनपा निधी सन २०२४-२५ अंतर्गत धुळे मनपाचा नवीन प्रशासकीय इमारतीच्या पूर्ण बाजूस रेकॉड रूम बनविणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका महासभा ठराव नं.106 दि.14/01/2025 मा.आयुक्त सो. यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.१,२८,७८,५८२/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्यकारी अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./586/2024-25 दि.28/01/ 2025 अन्वये रक्कम रु. १,२८,७८,५८२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/पा.पु.वि./855/2024-25 दि.28/01/ 2025 अन्वये दि.29/01/2025 रोजी दैनिक लोकसत्ता (राज्यस्तरीय)/नवभारत या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.10/02/2025 पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.आशिष एम.पटवारी | शे.0.99% कमीने | सर्वात कमी दर |
| 2 | मे.श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.0.10% कमीने | |
| 3 | मे.सिद्धेश ट्रेडर्स | शे.4 % जास्त | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.आशिष एम.पटवारी यांचे दर शे.०.९९% कमी दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.आशिष एम.पटवारी यांची शे.०.९९% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता याकामी श्री/ मे.आशिष एम.पटवारी यांचे शे. ०.९९% कमी या दराने या आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४४२ मनपा निधी सन २०२४-२५ अंतर्गत धुळे शहरात पांझरा नदी किनारी गार्डन समोर देखाव्यासाठी भिंती चित्राचे बांधकाम करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — मनपा निधी सन २०२४-२५ अंतर्गत धुळे शहरात पांझरा नदी किनारी गार्डन समोर देखाव्यासाठी भिंती चित्राचे बांधकाम करणे बाबत बाबत कामाच्या खर्चास रक्कम रु.९९,७७,९१४/- मात्र रकमेस मान्यता दिली असता मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा. प्रशासक तथा आयुक्त — सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२० दिनांक ०४/०४/२०२५**

मनपा निधी सन २०२४-२५ अंतर्गत धुळे शहरात पांझरा नदी किनारी गार्डन समोर देखाव्यासाठी भिंती चित्राचे बांधकाम करणे बाबत बाबतच्या कामास मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.24/01/2025 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.९९,७७,९१४/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्यकारी अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./277/2024-25 दि.16/01/2025 अन्वये रक्कम रु.९९,७७,९१४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/पा.पु.वि./817/2024-25 दि.20/01/ 2025 अन्वये दि.21/01/2025 रोजी दैनिक देशदूत/खान्देश खबर या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.28/01/2025 पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.गायत्री कन्सट्रक्शन | शे.4.00 % जास्त | |
| 2 | मे.एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| 3 | मे.रामेश्वर ट्रेडर्स | शे.3.00 % जास्त | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मंजुरीस्तव मे. स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता याकामी श्री/ मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराने या आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४४३ विकास शुल्क निधी सन २०२४-२५अंतर्गत सर्व्हे नं.४८९ चक्करबर्डी रोड येथील मनपा मालकीच्या दवाखाना येथे आवश्यक कामे करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता विकास शुल्क निधी सन 2024-25अंतर्गत सर्व्हे नं.489 चक्करबर्डी रोड येथील मनपा मालकीच्या दवाखाना येथे आवश्यक कामे करणे बाबत कामाच्या खर्चास रक्कम रु.34,94,656/- मात्र रकमेस मान्यता दिली असता मे. अंकित किशोर भंडारी यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आलेले आहे. हा विषय दर मंजुरीसाठी मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक ती साईट व्यवस्थित प्रोटेक्ट करुन घ्यावी. तेथे वॉचमनही ठेवा. यासाठी आमदार महोदयांना प्रस्ताव द्या. आमदार निधीतुन पैसे मिळाले तर बरे होईल. आयसीयु युनिट, ऑपरेशन थिएटर, ऑप्थलॉजीचा विभाग, मॅटर्निटी आणि बाकीचे आरोग्य शिबीरे होतील. एवढया मोठया कॅपॅसिटीचा दवाखाना बांधुन झाला आहे. उर्वरीत कंपाऊंड वॉलचे काम आणि रिक्वॉयर्ड गोष्टी या दोन महिन्यात पुर्ण केल्या तर दवाखान्याचे उदघाटन करता येईल. राहिलेल्या गोष्टी करुन घ्या. चांगला दवाखाना लोकांच्या सेवेसाठी उपलब्ध होईल.सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२१ दिनांक ०४/०४/२०२५**

विकास शुल्क निधी सन 2024-25अंतर्गत सर्व्हे नं.489 चक्करबर्डी रोड येथील मनपा मालकीच्या दवाखाना येथे आवश्यक कामे करणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.13/01/2025 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.34,94,656/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./582/2024-25 दि.13/01/2025 अन्वये रक्कम रु.34,94,656/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/पा.पु.वि./804/2024-25 दि.13/01/2025 अन्वये दि.14/01/2025 रोजी दैनिक देशदूत/श्रमराज्य या वृत्तपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.28/01/2025 पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.एकविरा कन्सट्रक्शन | शे.3.00 % जास्त | |
| 2 | मे.अंकित किशोर भंडारी | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| 3 | मे.रामेश्वर ट्रेडर्स | शे.4.00 % जास्त | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.अंकित किशोर भंडारी यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.अंकित किशोर भंडारी यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता याकामी श्री/मे.अंकित किशोर भंडारी यांचे दर अंदाजपत्रकीय दराने या दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.
वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-४४४ धुळे महानगरपालिका अंतर्गत महिला मेळाव्यास उपस्थित राहणाऱ्या बचतगटातील महिलांसाठी फुड पॅकेटची व्यवस्था व पाणी बॉटल वाटप करण्यात आलेल्या वाढीव खर्चास कार्यात्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.भांडारपाल मा.मंत्री,ग्राम विकास व पंचायत राज पर्यटन,महाराष्ट्र राज्य मुंबई तथा पालकमंत्री,धुळे जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय मेळावा राज्य राखीव पोलीस बल गट क्र.६ येथे मंगळवार दिंनाक ०८ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आलेला होता. त्याअन्वये धुळे महानगरपालिका अंतर्गत महिला मेळाव्यास उपस्थित राहणाऱ्या बचत गटातील महिलांसाठी फुड पॅकेटची व पाणी बॉटलची व्यवस्था नविन प्रशासकीय इमारत येथे तातडीने करण्यात आलेली होती. त्याकरीता रक्कम रु. ४४६०४/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी सदरचा विषय मे. स्थायी समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२२ दिनांक ०४/०४/२०२५**

मा.मंत्री,ग्राम विकास व पंचायत राज पर्यटन,महाराष्ट्र राज्य मुंबई तथा पालकमंत्री,धुळे जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय मेळावा राज्य राखीव पोलीस बल गट क्र.६ येथे मंगळवार दिंनाक ०८ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आलेला होता.

त्याअन्वये धुळे महानगरपालिका अंतर्गत महिला मेळाव्यास उपस्थित राहणाऱ्या बचत गटातील महिलांसाठी फुड पॅकेटची व्यवस्था नविन प्रशासकीय इमारत येथे तातडीने करण्यात यावी असे मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजुरीने कार्यालयीन आदेश भांडार विभागास प्राप्त झालेला आहे.

त्याअनुषंगाने सदरचे काम तातडीचे असल्याने सदरच्या कामाबाबत हिन्दुस्थान एन्टरप्राईजेस,धुळे त्यांच्याकडुन सदरचे काम करुन घेण्यात आलेले आहे.त्याअन्वये सदरच्या सेवाधारकां कडील बिलाप्रमाणे रु.४४६०४/- मात्र खर्च सादर झालेला आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव स्थायी समितीपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता धुळे महानगरपालिका अंतर्गत महिला मेळाव्यास उपस्थित राहणाऱ्या बचतगटातील महिलांसाठी फुड पॅकेटची व्यवस्था व पाणी बॉटल वाटप करण्यात आलेल्या खर्च रक्कम रु. ४४६०४/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियम नियम 67 (3) (क) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-४४५ मानधनावरील कनिष्ठ अभियंता, औषध निर्माता, डाटा ऐंट्री ऑपरेटर (संगणक लिपीक) व वॉचमन यांना 6 महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्यालयीन अधिक्षक धुळे महानगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता, औषध निर्माता,संगणक लिपीक,फिटर व वॉचमन (मानधन) कर्मचारी यांना ०६ महिने कालावधी करीता मुदतवाढ देण्यात आलेली होती.परंतु मानधन कर्मचारी यांची नियुक्तीची मुदत संपुष्टात आलेली आहे. उक्त मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याचा दिनांकापासुन ०५ दिवसांची सेवा खंडित करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२३ दिनांक ०४/०४/२०२५**

धुळे महानगरपालिकेतील खालीलप्रमाणे कनिष्ठ अभियंता, औषध निर्माता,संगणक लिपीक,फिटर व वॉचमन (मानधन) कर्मचारी यांना संदर्भीय आदेशान्वये ०६ महिने कालावधी करीता मुदतवाढ देण्यात आलेली होती.परंतु खालील नमुद मानधन कर्मचारी यांची नियुक्तीची मुदत त्यांच्या नावासमोर नमुद दिनांकास संपुष्टात आलेली आहे.

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | हुद्दा | मुदत संपुष्ठात आल्याचा दिनांक | मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | श्री बादल रमेश जुगलकर | वॉचमन | १२/०२/२०२५ | १२,०००/- |
| २ | श्री राजदिप सुनिल बैसाणे | कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक) | २/३/२०२५ | २२,०००/- |
| ३ | श्री यतिन किशोर तेलंग | कनिष्ठ अभियंता (इमारत निरीक्षक) | २/३/२०२५ | २२,०००/- |
| ४ | श्री संकेत जैतपुरे | औषध निर्माता | १२/०३/२०२५ | १७,७००/- |
| ५ | श्री मिलिंद रविंद्र नगराळे | डाटा ऐंट्री ऑपरेटर (संगणक लिपीक) | १२/०३/२०२५ | १७०००/- |
| ६ | श्रीमती भागयश्री प्रकाश मोरे | | | |
| ७ | श्री इमरान शेख इब्राहिम अत्तार | फीटर | १२/०३/२०२५ | १६,०००/- |

उक्त नमुद मानधनावरील कर्मचारी यांची सेवा संबंधित विभागाकरीता आवश्यक असल्याबाबत विभाग प्रमुख यांनी उक्त नमुद कर्मचारी यांना मुदतवाढ देणेबाबत शिफारस केलेली आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, वरील मानधनावरील कनिष्ठ अभियंता, औषध निर्माता, डाटा ऐंट्री ऑपरेटर (संगणक लिपीक) व वॉचमन यांना 6 महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मान्यता मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४४६ Selection of Agency for Conducting Swachh Bharat Mission Activities within Municipal area ऑनलाईन ई-निविदा सुचना क्र.२०२५_DMCD_११५०५१५_१ अंतर्गत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपायुक्त त्यासंदर्भात निविदा प्रक्रिया करुन त्यात २ लोकांनी भाग घेतला होता. एक ऑर्बेट टेक्नॉलॉजी व दुसरे क्वालिटी अॅण्ड सर्विसेस यात डोअर टु डोअर सेग्रीगेशनचे काम होणार आहे. डोअर टु डोअर कॅम्पेन आहे. कर्मचारी सन्मान अवेअरनेस कॅम्पेन हे सगळे पार्ट यात घेतले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक या सगळया अॅक्टीव्हीटी होतील याची खात्री करावी. यासाठी एक कर्मचारी डिप्लॉय करावा.

मा.उपायुक्त यासाठी प्रतिमाह शेडयुल तयार करतोय. इव्हेंट कॅलेंडर तयार करुन घेणार आहोत. इव्हेंटच्या हिशोबाने त्यांचे पेमेंट अदा होईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक ऑल इंडीयाचे इंचार्ज गिरीसाहेब आहेत. या कार्यवाहीसाठी कर्मचारी रिप्लेस करुन देणार आहे. त्यांना पण हे मॉनिटर करायला लावा. सोशल मिडीयाच्या हॅण्डलला व एसबीएस ULB कोड टाकुन डेली अॅक्टीव्हिटी याच्याशी रिलेटेड होतील, आणि हे वेळेत होतय का हे पहावे तसेच याची जबाबदारी सिस्टीम मॅनेजर श्री. पठाण यांचेकडे सोपवावी.

मा. प्रशासक तथा आयुक्त सदरचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२४ दिनांक ०४/०४/२०२५**

महाराष्ट्र शासनाचे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर धुळे महानगरपालिकेचे आरोग्य विभागामार्फत उपरोक्त कामाची ई निविदा सुचना क्र. १४६ सन २०२४-२५. ई निविदा Tender ID २०२५ DMCD_ ११५०५१५-१ प्रसिध्दीस देण्यांत आलेली आहे. तसेच दै लोकमत व दै.पथदर्शी या वृत्तपत्रातुन जाहीरात देण्यांत आलेली होती.

उक्त निविदेत एकुण दोन निविदाधारकांनी भाग घेवुन उक्त ई-निविदेत प्राप्त निविदाधारकांचे वित्तीय लिफाफा क्र.२(Financial Bid) उघडण्यास मंजुरी देण्यात आलेली असता प्रस्तावात नमूद अ.क्र. १ ते २५ उपक्रम तथा कार्यक्रम राबवणेकामी प्राप्त दरानुसार खालील प्रमाणे निविदाधारक L-१ व L-२ ठरत आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | प्राप्त दर |
| --- | --- | --- |
| L-१ | ORNET Technologies Pvt. Ltd. | १०९४२२५ |
| L -२ | QUALITY AND SERVICES | ६०४१०७० |

त्याअनुषंगाने उक्त दर मान्यतेकरीता सदरचा प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे मान्यतेकरीता सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता धुळे मनपा हद्दीत Conducting Swachh Bharat Mission Activities करीता प्रस्तावात नमूद अनुक्रमांक १ ते २५ उपक्रम तथा कार्यक्रम राबविणेकामी ORNET Technologies Pvt. Ltd. या संस्थेस नमूद दरानुसार देणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**